# श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.सोमेश्वरनगर
# ता.बारामती जि.पुणे

जा.क्रं./ऊस विकास /परिपत्रक/ ६२० /२०२६-२७ दिनांक - १२/०५/२०२६

## परिपत्रक

लागण हंगाम सन २०२६-२७ साठी व गाळप हंगाम सन २०२७-२८ करिता मा संचालक मंडळाने मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगांव व वसंतदादा शुगर इंन्स्टिट्युट मांजरी बु.॥ पुणे यांचे सल्ल्यानुसार खालीलप्रमाणे ऊस लागण नियोजन केलेले असुन त्याप्रमाणे पुढील हंगामात सभासद /शेअर मागणीदार यांनी ऊस लागण करावी.

**मा. संचालक मंडळ सभा दि. ११/०५/२०२६ ठराव क्रं. १५ नुसार**

| अ.नं. | लागवड हंगाम | हंगामाचा कालावधी | ऊस जाती | ऊस तोडणीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | आडसाली | ०१ जुलै ते १४ ऑगस्ट | को.८६०३२<br>व्हि.एस.आय.९८०५<br>को.एम.०२६५ | कारखाना चालु झालेपासुन लागण तारखे नुसार अनुक्रमे को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५, को.एम.०२६५ तोडणी चालु |
| | टिप ;- दि. ०२ /०७/२६ ते दि. ०३/०७/२६ पर्यंत लागण नोंदी बंद राहतील व दि. ०४/०७/२६ पासुन लागण नोंदी ज्या त्या तारखेस घेणे चालु राहील. | | | |
| २ | पुर्व हंगामी | ०१ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर | को.८६०३२ | आडसाली ऊसाची तोडणी संपले नंतर |
| | | --,,-- | व्हि.एस.आय.९८०५ | आडसाली ऊसाची तोडणी संपले नंतर |
| | | --,,-- | को.एम.०२६५ | आडसाली ऊसाची तोडणी संपले नंतर |
| | | --,,-- | फुले ऊस १३००७ | आडसाली ऊसाची तोडणी संपले नंतर |
| | | ०१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | एम.एस.१०००१ | डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | ०१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | फुले ऊस १५०१२ | डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | ०१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | व्हि.एस.आय.०८००५ | १ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| ३ | सुरु | ०१ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी | एम.एस.१०००१ | १५ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | को.८६०३२ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | व्हि.एस.आय.०८००५ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | व्हि.एस.आय.९८०५ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | फुले ऊस १५०१२ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | फुले ऊस १३००७ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | को.एम.०२६५ | आडसाली व पुर्व हंगामी ऊस संपले नंतर |
| ४ | खोडवा | हंगाम संपेपर्यत तुटलेल्या ऊसाचा खोडवा | को.८६०३२ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | व्हि.एस.आय.९८०५ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | फुले ऊस १३००७ | १५ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | एम.एस.१०००१ | १ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | को.एम.०२६५ | १५ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | --,,-- | व्हि.एस.आय.०८००५ | १ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | | फुले ऊस १५०१२ | १ जानेवारी पासुन तोडणी चालु |

**खोडवा व पुर्व हंगामी हंगामातील लवकर पक्व होणा-या (एम.एस.१०००१, व्हि.एस.आय.०८००५) ऊसाच्या तोडणीचा कार्यक्रम आडसाली ऊस शिल्लक राहिला तरी नियमाप्रमाणे केला जाईल. सदरचे परिपत्रक १०००० एकर आडसाली ऊस गृहित धरुन केले आहे.**

❖ **सभासदांनी कारखान्याकडे नोंदलेला ऊस कारखान्याच्या संमती शिवाय इतर कारखान्याकडे गाळपास दिलेस सभासदांना दिले जाणा-या सोई सवलती (उदा: साखर, ऊस रोपे, ऊस बियाणे, ताग, ध्येंच्या, सोयाबीन बीयाणे, कंपोस्ट खत इ.) बंद करणेत येतील याची नोंद घ्यावी.**

**सर्वसाधारण सुचना ;-**

१) कारखान्याचे पोटनियम क्रं. १७ (अ) २,३ I,II,III नुसार सभासदाने मालक संरक्षित कुळ अथवा साधे कुळ सहिस्सेदार या नात्याने त्याने धारण केलेल्या व प्रत्यक्ष त्याच्या ताब्यामध्ये असलेल्या क्षेत्रामधुनच ऊस नोंद देणे बंधनकारक आहे व तशी नोंद त्याने धारण केलेल्या शेतजमिनीचे शासकीय महसुली रेकॉर्डला असणे बंधनकारक आहे व अशाच ऊस नोंदीचे क्षेत्र गाळपास स्विकारले जाईल.

२) सभासदाचे धारण किंवा मालकी हक्काचे शेतजमीन वा ऊस नोंदीबाबत वाद उपस्थित झालेस त्याची जबाबदारी संबंधित सभासदाची राहिल व असा ऊस स्विकारणेचे कारखान्यावर बंधन असणार नाही मात्र कायदेशीर बाबीवर झालेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

३) कारखान्याचा गाळप हंगाम सुरु झालेनंतर ऊस नोंदणीबाबत व गाळपा बाबत तसेच ऊस बिलांबाबत उपस्थित होणा-या तक्रारी संबंधाने कारखाना पोटनियम व परिपत्रकिय धोरणानुसारच कार्यवाही केली जाईल. मे.न्यायालयामध्ये प्रलंबीत प्रकरणांवर मे.न्यायालयाच्या निर्णयानुसार अंतीम कार्यवाही केली जाईल. मे.न्यायालयीन प्रक्रियेमध्ये विलंबामुळे होणारे संबंधितांचे नुकसानीची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही.

४) सभासदांचे अंतर्गत कौटुंबीक शेतजमिनीच्या प्रश्नामुळे निर्माण होणारे वाद व त्यामुळे होणा-या नुकसानीची जबाबदारी संबंधित सभासदाची राहील, सभासदाने आपले वाद, प्रश्न आपल्या स्तरावर अगर मे.न्यायालयामध्ये अगर योग्य त्या न्यायाधीकरणाकडे परस्पर दाद मागुन निर्णित करुन घ्यावेत व तसे कारखान्यास लेखी स्वरुपामध्ये कळविल्यानंतरच सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. असे वाद, प्रश्न संपुष्टात न आलेस त्यामुळे होणा-या नुकसानीची जबाबदारी संबंधित सभासदाची राहील.

५) **सभासदांनी त्यांच्या एकुण ऊस लागण क्षेत्रा पैकी आडसाली ४०%, पुर्व हंगामी १५%, सुरू १०%, खोडवा ३५% या प्रमाणात ऊस लागणीचे नियोजन करावे.**

६) सभासदांनी ऊस लागवड आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ऊस बेणे लागवडीपुर्वी १०० लि.पाणी + ३६ ग्रॅम इमिडाक्लोप्रिड (७० टक्के wg) + १०० ग्रॅम बावीस्टीनची १० मिनिटापर्यंत बेणे प्रक्रिया करावी व त्यानंतर बेणे ॲसिटोबॅक्टर १ लि. व पी.एस.बी. (स्फुरद विरघळविणारे जिवाणू) १ लि. आणि वसंत उर्जा १ लिटर २०० लि.पाण्यात मिसळुन तयार केलेल्या द्रावणात ऊसाची टिपरी ३० मि. बुडवुन लागण करावी. जैविकखते व व्हि.एस.आय निर्मीत वसंत उर्जा कारखान्यावरती नाममात्र दरात उपलब्ध आहेत. तसेच माती परिक्षण करुन शिफारशीत प्रमाणात बेसल डोसचा वापर करावा.

मागे पहा,

७) **ऊस लागण करणेकरीता दि.०१/०७/२०२६ पासुन परवानगी देणेत आली आहे. त्याचे ऊस लागण नोंदीचे फॉर्म सभासदांनी दि.२७/०६/२०२६ पासून (सुट्टीचे दिवस सोडुन)दि. ०१/०७/२०२६ पर्यंत गट ऑफिस मध्ये वेळेत भरुन देणेचे आहेत. त्याची क्रमवारी ड्रॉ पध्दतीने दि.०५/०७/२०२६ रोजी काढणेत येईल. त्याची तारीख ०१/०७/२०२६ धरणेत येईल, दि. ०२/०७/२०२६ ते दि. ०३ /०७/२०२६ पर्यंत लागण नोंदी बंद राहतील. दि. ०४/०७/२६ पासुन लागण नोंदी ज्या त्या तारखेस घेणे चालु राहील. तसेच दि. ०१/०९/२०२६ मधील लागण नोंदी जास्त आलेस सदर नोंदीचा ड्रॉ दि. ०५/०९/२०२६ रोजी काढणेत येईल.**

८) **ऊस नोंद देते वेळी ज्या नावे ऊस नोंद देणार आहे त्यांचे कारखान्याने सभासद / शेअर्स मागणीदार यांना दिलेले ओळखपत्र (स्मार्ट साखर कार्ड) सोबत आणावे.**

९) कारखान्याने ठरवुन दिलेल्या तारखेपुर्वी ऊसाची नियमबाह्य लागण केल्यास सदर ऊसाची लागण तारीख ठरवुन दिलेल्या तारखे पासुन पुढे १५ दिवस उशिरा धरली जाईल.

१०) रोप लागण ज्या दिवशी शेतात केली जाईल त्या दिवशीचीच लागण तारीख नोंद घेतली जाईल. लागण तारखेनुसार ऊस तोडीसाठी आडसाली हंगामातील महिन्यानुसार खालील क्रमवारी प्रमाणे तोडणी कार्यक्रम राबविणेत येईल.

**अ)** ७ व्या (जुलै ) महिन्यातील ०१/०७ च्या तुटणा-या ऊसामधील को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ या ऊस जातींच्या रोप लागणीस प्रथम व त्या नंतर को.एम.०२६५ या ऊस जातीच्या रोप लागणीच्या ऊसास तोड देणेत येईल.

**ब)** आडसाली हंगामातील **दि.०४/०७/ ते ३१/०७/** च्या को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ व को.एम.०२६५ या ऊस जातींची अनुक्रमे ५० टक्के **रोप लागणीस** तारखेनुसार व ५० टक्के **०१/०७/** च्या को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ व को.एम.०२६५ **टिपरी लागणीच्या** ऊसास अनुक्रमे तोड देणेत येईल.

**क)** आडसाली हंगामातील दि.**०१/०८/ ते १४/०८/** च्या को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ व को.एम. ०२६५ या ऊस जातींची अनुक्रमे ५० टक्के **रोप लागणीस** तारखेनुसार व ५० टक्के **०४/०७/ ते ३१/०७/** च्या को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ व को.एम.०२६५ **टिपरी लागणीच्या** ऊसास अनुक्रमे तारखेनुसार तोड देणेत येईल.

**ड)** ८ व्या (ऑगस्ट) महिन्यातील को.८६०३२, व्हि.एस.आय. ९८०५ या जातींच्या टिपरी लागणीस व त्यानंतर को.एम.०२६५ या जातीच्या टिपरी लागणीच्या ऊसास तारखे नुसार तोड देणेत येईल. तसेच इतर हंगामातील प्रत्येक महिन्यातील ऊस जातीची रोपे व त्या नंतर अनुक्रमे टिपरी लागणीच्या ऊसास तोड देणेत येईल.

११) **सभासदांनी आडसाली ऊस सरसकट कापुन काढलेचे निदर्शनास आलेस त्या ऊसाची लागण तारीख रद्द होईल व सभासदांना त्या ऊसाची लागण तारीख पुन्हा नव्याने देणे बंधनकारक राहिल व सदर ऊसाची नव्याने दिलेली नोंद खोडवा म्हणुन घेणेत येईल. अशा खोडव्यास व्यवस्थापनाने दिलेले कोणत्याही प्रकारचे अनुदान लागु होणार नाही.**

१२) कारखान्यामार्फत घेतलेल्या ऊस रोपांबाबत मागणीदार सभासद शेतक-याची काही तक्रार असल्यास रोपे मिळाल्या पासुन दोन दिवसात कारखान्याच्या ऊसविकास विभागाशी संपर्क साधावा.

१३) ऊसाची लागण ५ फुट पट्टा पद्धतीने केल्यामुळे प्रती एकरी ऊस उत्पादनात वाढ होत असुन पट्टा पद्धतीने लागवड केल्यामुळे ऊसावरील किड व रोग नियंत्रित करणे सोपे जाते.

१४) हार्वेस्टरने ऊस तोडणी करीता पट्टा पद्धतीने लागण करणे गरजेचे आहे, तसेच हार्वेस्टरद्वारे ऊस तोडणीला प्राधान्य देणेत येत असल्याने सर्व सभासदांना आवाहन करणेत येते की ऊस लागण करताना रुंद सरी अथवा पट्टा पद्धतीचा अवलंब करावा तसेच हार्वेस्टरद्वारे ऊस तोड येणे पुर्वी २० दिवस आधी ऊस प्लॉटला पाणी देणे बंद करावे. अन्यथा तोडणी मजुरांच्या उपलब्धते अभावी स्वत: ऊस तोडुन कारखान्यावर आणावा लागेल याची नोंद घ्यावी. **ज्या सभासदांनी शेतात किमान ४.५ फुट अंतर ठेवून ऊस लागवड/खोडवा असेल व असा ऊस हार्वेस्टरने तुटलेला आहे त्या सभासदांच्या तुटलेल्या ऊसास कारखान्या मार्फत प्रती मे.टन रक्कम रु. ५०/- अनुदान देणेत येईल.**

१५) प्रती एकरी १० मे.टन किंवा त्या पेक्षा कमी ऊस असणा-या क्षेत्राची ऊस तोडणी मजुर करित नसल्यामुळे सदरचा ऊस, ऊस पोटनियम नं.१८ (अ) २ नुसार तसेच पोटनियम ५९ मधील तरतुदी नुसार उत्पादकास स्वत: तोडुन कारखान्यावर पोहोच करावा लागेल.

१६) **परिपत्रकानुसार सभासदाने लागण क्षेत्राची नोंद ज्या त्या वेळी देणेची आहे, तसेच लागण नोंद करेक्ट करतेवेळी ऊस बेणे टिपरी मातीआड करुन संदर क्षेत्रास पाणी देणे आवश्यक आहे. अन्यथा सदरील क्षेत्राची लागण नोंद रद्द केली जाईल त्याचप्रमाणे ऊस लागण नोंदणीबाबत काही तक्रार असल्यास ऊस लागण नोंद दिले नंतर १५ दिवसाचे आत अर्ज देणे, त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच नंतर कोणत्याही प्रकारची नोंद रुजवात घेताना अथवा गाळप हंगाम चालु झाल्या नंतर घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

१७) **ऊस उत्पादकांनी दिलेली लागण नोंद खोटी (बोगस) असल्यास रु.५००/- ऊस बिलातुन वसुल केली जाईल व त्याची नोंद रद्द केली जाईल. सदर रद्द केलेल्या क्षेत्राची नोंद सभासदाने पुन्हा देणे आवश्यक आहे.**

१८) सभासदांना कारखान्याच्या सोई-सवलती उदा; ऊस बियाणे, ऊस रोपे, माती पाणी परिक्षण, ताग व ध्येंच्या, सबसॉईलर,बायोकंपोस्ट खत इ.सुविधा शेअर्सच्या प्रमाणात दिल्या जातील. सदर सोई सवलतीच्या मागणी अर्जा सोबत सभासदाने आपले फोटो ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.

१९) मध्यम ते हलक्या जमिनीत ऊस लागवड करणा-या सभासदांनी पुर्व हंगामी व सुरु हंगामात को.८६०३२, एम.एस.१०००१, व्हि.एस.आय.९८०५, फुले ऊस १३००७ व फुले ऊस १५०१२ या ऊस जातींची लागवड करावी.

२०) **७/१२ प्रमाणे नोंदी देणे बंधनकारक आहे. सदरची नोंद मयत,वारस प्रकरण, घरगुती वाटप, खरेदी-विक्री किंवा ७/१२ बदल झालेस ऊस नोंद क्षेत्र वर्ग करुन घ्यावे अन्यथा नोंदीप्रमाणे ऊस गळीतास आणला जाईल.**

२१) ऊस विकास परिपत्रक जा.क्र. ३७३६ दि.०७/११/२०१८ नुसार ऊस वाढ प्रोत्साहन योजनेत ज्या सभासदांस भाग घ्यावयाचा आहे त्यांनी ऊस तोड येणे पुर्वी नोंदणी रक्कम रु. १००/-भरुन आपला सहभाग नोंदवावा. सदर योजनेमध्ये यापुर्वी बक्षिस मिळालेले सभासद पुन्हा बक्षिसास पात्र राहणार नाहीत.

२२) सदरचे लागण नियोजन परिपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार बदल करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

तरी वरील सुचनांचे पालन करुन सर्व सभासदांनी सहकार्य करावे ही विनंती.

आपले नम्र

**(राजेंद्र ना.यादव)**
**कार्यकारी संचालक**

**(मिलिंद ब. कांबळे)**
**व्हा.चेअरमन**
**व**
**संचालक मंडळ**

**(पुरुषोत्तम रा. जगताप)**
**चेअरमन**